# ससूनमधील नवजात शिशु अतिदक्षता विभागाचे लोकार्पण

## वैद्यकीय शिक्षणमंत्री महाजन यांच्या हस्ते उद्घाटन





**पुणे** : राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयामध्ये पथदर्शी ठरणाऱ्या पुणे येथील बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालयमध्ये ५९ खाटांची सुविधा असलेल्या अत्याधुनिक नवजात शिशु अतिदक्षता विभागाचे वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश बापट व सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, खासदार अनिल शिरोळे, दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे हे कार्यक्रमास उपस्थित होते.

यावेळी महाजन म्हणाले की, महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांपैकी ससून सर्वोपचार रुग्णालय हे पहिले अद्ययावत रुग्णालय आहे. सर्वसामान्य जनतेला व पालकांना त्यांच्या नवजात बालकास तातडीने उपचार मिळण्यासाठी नक्कीच या विभागाची मदत हाईल. बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले प्रास्तविक करताना म्हणाले, ससून सर्वोपचार रुग्णालयाची सर्वसामान्यांचे रुग्णालय म्हणून ओळख आहे. येथे उपचारासाठी गरीब, कष्टकरी सर्वसामान्य जनतेसाठी औषधोपचार दिले जातात. नवजात बालकांना विविध आजारांवर तातडीने उपचार होण्यासाठी अतिदक्षता विभागामध्ये दाखल करावे लागते. खासगी रुग्णालयामध्ये उपचारासाठी होणारा खर्च सर्वसामान्यांना न परवडणारा असतो. त्यामुळे अत्याधुनिक सेवा सुविधा सर्वसामान्य जनतेस उपलब्ध व्हाव्यात, या हेतूने विविध व्यावसायिक कंपन्यांनी त्यांचे व्यावसायिक, सामाजिक जबाबदारी सी.एस.आर प्रकल्पाच्या मार्फत दानस्वरुपात निधी उपलब्ध करून शिशु अतिदक्षता विभाग सुरू करण्यात आला आहे. तसेच अत्याधुनिक सुविधा, डॉक्टर्स व प्रशिक्षित नर्सेस यांची २४ तास सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यावेळी पालकमंत्री गिरीश बापट, सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, खासदार अनिल शिरोळे यांनीही समयोचित भाषणे केली. यावेळी कार्यक्रमास डॉक्टर्स, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.